**24.11.2025** प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

“गोड मुलांनो - तुमची ही वेळ अतिशय मौल्यवान आहे, त्यामुळे याला व्यर्थ गमावू नका, पात्रता पाहून ज्ञानाचे दान करा”

प्रश्नः- गुणांची धारणा देखील होत जाईल आणि चलन (वर्तन) देखील सुधारत जाईल याची सोपी विधी कोणती आहे?

उत्तरः- जे बाबांनी समजावून सांगितले आहे - ते इतरांना समजावून सांगा. ज्ञान धनाचे दान करा तर गुणांची धारणा देखील सहज होत जाईल आणि चलन देखील सुधारत जाईल. ज्यांच्या बुद्धीमध्ये हे नॉलेज राहत नाही, ज्ञान धनाचे दान करत नाहीत, ते आहेत कंजूस. ते फुकटचा आपला तोटा करून घेतात.

गीतः- बचपन के दिन भुला न देना…

ओम् शांती. गोड-गोड मुलांनी गीत ऐकले, अर्थ तर चांगल्या प्रकारे समजला. आपण आत्मा आहोत आणि बेहदच्या बाबांची मुले आहोत - हे विसरू नका. आता-आता बाबांच्या आठवणीमध्ये हर्षित होतात, आणि लगेच मग आठवण विसरल्याने पुन्हा दुःखी होतात. आता-आता जिवंत होता, आता-आता मरून जाता अर्थात आता-आता बेहदच्या बाबांचे बनतात, आणि लगेचच मग देहधारी परिवाराकडे निघून जाता. तर बाबा म्हणतात - आज हसाल उद्या रडू नका. हा आहे गाण्याचा अर्थ.

तुम्ही मुले जाणता - मनुष्य जास्त करून शांतीसाठीच खस्ता खातात. तीर्थ यात्रेवर जातात. असे नाही की धक्का खाल्ल्याने कोणती शांती मिळते. हे एकच संगमयुग आहे, जेव्हा बाबा येऊन सांगत आहेत. सर्वात पहिले तर स्वतःला ओळखा. आत्माच शांत स्वरूप आहे. राहण्याचे स्थान देखील शांतीधाम आहे. आत्मा इथे येते तर कर्म जरूर करावे लागते. आत्मा जेव्हा आपल्या शांतीधाममध्ये आहे तोपर्यंत शांत आहे. सतयुगामध्ये देखील शांती असते. सुख देखील आहे, शांती देखील आहे. शांतीधामला सुखधाम म्हणता येणार नाही. जिथे सुख आहे त्याला सुखधाम, जिथे दुःख आहे त्याला दुःखधाम म्हणणार. या सर्व गोष्टी तुम्हाला समजत आहेत. हे सर्व सांगण्यासाठी कोणालाही सन्मुखच समजावून सांगितले जाते. प्रदर्शनीमध्ये जेव्हा आतमध्ये येतात तर सर्वप्रथम बाबांचाच परिचय दिला पाहिजे. स्पष्ट करून सांगितले जाते - आत्म्यांचे पिता एकच आहेत. तेच गीतेचे भगवान आहेत. बाकी हे सर्व आत्मे आहेत. आत्मा शरीर सोडते आणि घेते. शरीराचीच नावे बदलतात. आत्म्याचे नाव बदलत नाही. तर तुम्ही मुले सांगू शकता - बेहदच्या बाबांद्वारेच सुखाचा वारसा मिळतो. बाबा सुखाची सृष्टी स्थापन करतात. बाबा दुःखाची सृष्टी रचतील असे काही होत नाही. भारतामध्ये लक्ष्मी-नारायणाचे राज्य होते ना. चित्रे देखील आहेत - बोला, हा सुखाचा वारसा मिळतो. जर ते म्हणतील ही तर तुमची कल्पना आहे तर सोडून दिले पाहिजे. कल्पना समजणारा काहीच समजणार नाही. तुमचा वेळ तर अतिशय मौल्यवान आहे. या संपूर्ण दुनियेमध्ये तुमच्या इतका मौल्यवान वेळ इतर कोणाचाच नाही. मोठ-मोठ्या लोकांचा वेळ किमती असतो. बाबांचा वेळ किती किमती आहे. बाबा हे ज्ञान सांगून कोणापासून कोण बनवतात. तर बाबा तुम्हा मुलांनाच म्हणतात की, तुम्ही तुमचा किमती वेळ वाया घालवू नका. नॉलेज पात्र असणाऱ्यांनाच द्यायचे आहे. पात्र असणाऱ्याला समजावून सांगितले पाहिजे - सगळीच मुले काही समजू शकणार नाहीत, एवढी बुद्धी नाहीये जे लगेच समजतील. सर्वप्रथम बाबांचा परिचय द्यायचा आहे. जोपर्यंत हे समजत नाहीत की, आम्हा सर्व आत्म्यांचे पिता शिवबाबा आहेत तोपर्यंत त्यांना पुढे काहीच समजणार नाही. खूप प्रेमाने, नम्रतेने समजावून सांगून पाठवले पाहिजे कारण आसुरी संप्रदाय भांडण करण्यामध्ये वेळ लावणार नाहीत. गव्हर्मेंट, विद्यार्थ्यांची किती महिमा करते. त्यांच्यासाठी किती प्रबंध (सुविधा) उपलब्ध करून देते. कॉलेजचे स्टुडंटच सर्वात पहिले दगड मारायला सुरू करतात. जोश असतो ना. वृद्ध किंवा माता तर दगड इतक्या जोराने मारू शकणार नाहीत. जास्त करून स्टुडंटचाच गोंधळ असतो. त्यांनाच युद्धासाठी तयार करतात. आता बाबा आत्म्यांना सांगत आहेत - तुम्ही उलटे बनले आहात. स्वतःला आत्मा समजण्या ऐवजी शरीर समजता. आता बाबा तुम्हाला सरळ करत आहेत. किती रात्र-दिवसाचा फरक होतो. सरळ झाल्याने तुम्ही विश्वाचे मालक बनता. आता तुम्ही समजता आपण अर्धे कल्प

उलटे होतो. आता बाबा अर्ध्या कल्पासाठी सुलटे बनवत आहेत. अल्लाहची संतान बनता तर विश्वाच्या बादशाहीचा वारसा मिळतो. रावण उलटे करतो तर कला काया नष्ट होते मग घसरतच जातात (अधोगती होत राहते). रामराज्य आणि रावणराज्याला तुम्ही मुलेच जाणता. तुम्हाला बाबांच्या आठवणीमध्ये रहायचे आहे. भले शरीर निर्वाह अर्थ कर्म देखील करायचे आहे, तरी देखील वेळ तर खूप मिळतो. कोणी जिज्ञासू इत्यादी नसेल, काही काम नसेल तर बाबांच्या आठवणीमध्ये बसले पाहिजे. ती तर आहे अल्पकाळासाठी कमाई आणि तुमची ही आहे कायमसाठी कमाई, यामध्ये जास्त अटेंन्शन द्यावे लागते. माया वारंवार विचारांना इतरत्र घेऊन जाते. हे तर होईलच. माया विसरायला लावत राहील. यावर एक नाटक देखील दाखवतात - प्रभू असे म्हणतात, माया असे म्हणते. बाबा मुलांना समजावून सांगत आहेत मामेकम् (मज एकाची) आठवण करा, यामध्येच विघ्न पडतात. इतर कोणत्याही गोष्टीमध्ये इतकी विघ्ने पडत नाहीत. पवित्रतेवरून किती मार खातात. भागवत इत्यादीमध्ये या वेळेचेच गायन आहे. पूतना, शूर्पणखा देखील आहेत, या सर्व या वेळच्या गोष्टी आहेत. जेव्हा की बाबा येऊन पवित्र बनवतात. जे उत्सव इत्यादी देखील साजरे करतात, जे पास्ट झाले आहे, त्याचे मग सण साजरे करतात. पास्टची महिमा करत राहतात. राम-राज्याची महिमा गातात कारण पास्ट झाले आहे. जसे क्राइस्ट इत्यादी आले, धर्म स्थापन करून गेले. तिथी-तारीख देखील लिहितात मग त्यांचा बर्थडे साजरा करत राहतात. भक्ती मार्गामध्ये देखील हा धंदा अर्धा कल्प चालतो. सतयुगामध्ये असे होत नाही. ही दुनियाच नष्ट होणार आहे. या गोष्टी तुमच्यामध्ये देखील फार थोडे आहेत जे समजतात. बाबांनी समजावून सांगितले आहे सर्व आत्म्यांना शेवटी परत जायचे आहे. सर्व आत्मे शरीर सोडून निघून जातील. तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये आहे - बाकी थोडे दिवस आहेत. आता पुन्हा हे सर्व विनाश होणार आहे. सतयुगामध्ये फक्त आपणच येणार. सगळेच आत्मे काही येणार नाहीत. जे कल्पापूर्वी आले होते तेच नंबरवार येतील. तेच चांगल्या प्रकारे शिकून मग शिकवत देखील आहेत. जे चांगले शिकतात तेच मग नंबरवार ट्रान्सफर होतात. तुम्ही देखील ट्रान्सफर होता. तुमची बुद्धी जाणते जे आत्मे आहेत ते सर्व नंबरवार तिथे शांतीधाममध्ये जाऊन बसतील आणि मग नंबरवार येत राहतील. बाबा तरीही म्हणतात मुख्य गोष्ट आहे - बाबांचा परिचय देणे. बाबांचे नाव सदैव मुखामध्ये असावे. आत्मा काय आहे, परमात्मा कोण आहेत? दुनियेमध्ये हे कोणीही जाणत नाहीत. भले गातात - ‘भृकुटी के बीच मे चमकता है अजब सितारा…’ बस्स, याहून जास्त काहीच समजत नाहीत. तेही हे ज्ञान खूप कमी लोकांच्या बुद्धीमध्ये आहे. वारंवार विसरून जातात. सर्वप्रथम समजावून सांगायचे आहे बाबाच पतित-पावन आहेत. वारसा देखील देतात, शहेनशहा बनवतात. तुमच्याकडे एक गाणे देखील आहे - ‘आखिर वह दिन आया आज…’ ज्याची भक्ती मार्गामध्ये खूप वाट पाहत होतो. द्वापर पासून भक्ती सुरू होते मग अंतामध्ये बाबा येऊन रस्ता सांगतात. कयामतची वेळ (महाविनाशाची वेळ) देखील यालाच म्हटले जाते. आसुरी बंधनाचा सर्व हिशोब चुकता करून पुन्हा परत निघून जातात. ८४ च्या जन्मांच्या पार्टला तुम्हीच जाणता. हा पार्ट चालूच राहतो. शिवजयंती साजरी करतात तर जरूर शिव आले असतील. जरूर काही केले असेल. तेच नवीन दुनिया बनवतात. हे लक्ष्मी-नारायण विश्वाचे मालक होते. आता नाहीत. पुन्हा बाबा राजयोग शिकवत आहेत. हा राजयोग शिकवला होता. तुमच्या व्यतिरिक्त इतर कोणाच्या मुखामध्ये हे येऊ शकणार नाही, तुम्हीच म्हणू शकता की, शिवबाबा आम्हाला राजयोग शिकवत आहेत. शिवोहम् चे जे मंत्रोच्चारण करतात ते देखील चुकीचे आहे. तुम्हाला आता बाबांनी सांगितले आहे - तुम्हीच चक्र फिरत ब्राह्मण कुळातून देवता कुळामध्ये येता. ‘सो हम, हम सो’ चा अर्थ देखील तुम्हीच समजावून सांगू शकता. आता आपण ब्राह्मण आहोत हे ८४ चे चक्र आहे. हा काही मंत्र जपायचा नाहीये. बुद्धीमध्ये याचा अर्थ राहिला पाहिजे. ती देखील सेकंदाची गोष्ट आहे. जसे बीज आणि झाड सेकंदामध्ये लगेचच लक्षात येते. तसेच ‘हम सो’ चे रहस्य देखील सेकंदामध्ये लक्षात येते. आपण असे चक्र फिरतो ज्याला स्वदर्शन चक्र देखील म्हटले जाते. तुम्ही कोणाला म्हणाल, ‘आम्ही स्वदर्शन चक्रधारी आहोत’, तर कोणी मानणार नाहीत. म्हणतील हे तर स्वतःला उपाधी देत आहेत. मग तुम्ही समजावून सांगाल की, आम्ही ८४ जन्म कसे घेतो. हे चक्र फिरत आहे. आत्म्याला आपल्या ८४ जन्मांचे दर्शन होते, यालाच स्वदर्शन चक्रधारी म्हटले जाते. पहिले तर ऐकून चकित होतात. ह्या काय थापा मारत आहेत. जेव्हा तुम्ही बाबांचा परिचय द्याल तेव्हा त्यांना थापा वाटणार नाहीत. बाबांची आठवण करतात. गातात देखील बाबा तुम्ही याल तर आम्ही वारी जाऊ (समर्पण होऊ). तुमचीच आठवण करणार. बाबा म्हणतात - तुम्ही म्हणत होता ना - आता मग मी तुम्हाला आठवण करून देत आहे. नष्टोमोहा बना. या देहा पासून देखील नष्टोमोहा बना. स्वतःला आत्मा समजून माझीच आठवण करा तर तुमची विकर्म विनाश होतील. या सुंदर गोष्टी सर्वांना आवडतील. बाबांचा परिचय नसेल तर मग कोणत्या ना कोणत्या गोष्टीमध्ये शंका येत राहतील, म्हणून पहिले तर २-४ चित्र समोर ठेवा, ज्यामध्ये बाबांचा परिचय असेल. बाबांचा परिचय मिळाल्याने

वारसा देखील मिळेल.

बाबा म्हणतात - मी तुम्हाला राजांचाही राजा बनवतो. हे चित्र बनवा. डबल मुकुटधारी राजांच्या समोर सिंगल मुकुटधारी माथा टेकवतात. आपेही पूज्य आपेही पुजारीचे रहस्य देखील लक्षात येईल. अगोदर बाबांची पूजा करतात आणि मग आपल्याच चित्रांची बसून पूजा करायला लागतात. जे पावन होऊन गेले आहेत त्यांच्या मुर्त्या बनवून पूजा करतात. हे देखील तुम्हाला आता ज्ञान मिळाले आहे. पहिले तर भगवंतासाठी म्हणत होते - 'आपेही पूज्य आपेही पुजारी'. आता तुम्हाला सांगितले गेले आहे - तुम्हीच या चक्रामध्ये येता. बुद्धीमध्ये हे नॉलेज पक्के होते मग इतरांना देखील समजावून सांगायचे आहे. 'धन दिये धन ना खुटे...' जे धन दान करत नाहीत त्यांना कंजूस देखील म्हटले जाते. बाबांनी जे समजावून सांगितले आहे ते मग इतरांना समजावून सांगायचे आहे. जर सांगितले नाहीत तर फुकट स्वतःलाच तोट्यात घालाल. गुण देखील धारण होणार नाहीत. चलन (वर्तन) देखील असेच होईल. प्रत्येकजण स्वतःला समजू तर शकता ना. तुम्हाला आता समज मिळाली (ज्ञान मिळाले) आहे. बाकी सर्व आहेत बेसमज. तुम्ही सर्व काही जाणता. बाबा म्हणतात एकीकडे आहे - दैवी संप्रदाय, दुसरीकडे आहे - आसुरी संप्रदाय. बुद्धीने तुम्ही जाणता आता आपण संगमयुगावर आहोत. एकाच घरामध्ये एक संगमयुगाचा, एक कलियुगाचा, दोघेही एकत्र राहतात. मग पाहिले जाते हंस बनण्या लायक नाही आहे तर युक्ती रचली जाते. नाही तर विघ्न टाकत राहतील. प्रयत्न करायचा आहे आप समान बनविण्याचा. नाही तर हैराण करत राहतील त्यामुळे मग युक्तीने सोडून द्यावे लागते. विघ्न तर पडणारच आहेत. असे नॉलेज तर तुम्हीच देऊ शकता. अतिशय मधुर देखील बनायचे आहे. नष्टोमोहा देखील बनावे लागेल. एका विकाराला सोडले की मग बाकीचे विकार गोंधळ माजवतात. समजले जाते जे काही होते ते कल्पापूर्वी प्रमाणे होते. असे समजून शांत रहावे लागते. भावी समजली जाते. चांगले ज्ञान समजावून सांगणारी मुले देखील घसरतात (अधोगती होते). खूप जोराने फटका बसतो. मग म्हटले जाते कल्पापूर्वी देखील फटका खाल्ला असेल. प्रत्येक जण स्वतःला समजू शकतात. लिहितात देखील - 'बाबा, मला क्रोध आला, अमक्याला मारले ही चूक झाली'. बाबा म्हणतात - जितके शक्य होईल तितके कंट्रोल करा. कसली-कसली माणसे असतात, अबलांवर किती अत्याचार करतात. पुरुष बलवान असतात, स्त्री अबला असते. बाबा मग तुम्हाला हे गुप्त युद्ध करायला शिकवतात ज्याद्वारे तुम्ही रावणावर विजय प्राप्त करता. ही लढाई कोणाच्याही बुद्धीमध्ये नाही आहे. तुमच्यामध्ये देखील नंबरवार आहेत जे समजू शकतात. ही आहे एकदम नवीन गोष्ट. आता तुम्ही शिकत आहात - सुखधामकरिता. हे देखील आता आठवणीत आहे मग विसरून जाणार. मुख्य गोष्ट आहेच आठवणीची यात्रा. आठवणीनेच आपण पावन बनणार आहोत. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) काहीही झाले तरी भावी समजून शांत रहायचे आहे. क्रोध करायचा नाही. जितके शक्य होईल स्वतःला कंट्रोल करायचे आहे. युक्ती रचून आप समान बनविण्याचा प्रयत्न करायचा आहे.

२) अतिशय प्रेमाने आणि नम्रतेने सर्वांना बाबांचा परिचय द्यायचा आहे. सर्वांना हीच गोड-गोड बातमी ऐकवा की, बाबा म्हणतात स्वतःला आत्मा समजून माझी आठवण करा, या देहा पासून नष्टोमोहा बना.

वरदान:- प्रत्येक आत्म्याला भटकण्यापासून किंवा भिकारीपणा पासून वाचविणारे निष्काम दयाळू भव

जी मुले निष्काम दयाळू आहेत त्यांच्या दयेच्या संकल्पाने अन्य आत्म्यांना आपले रूहानी रूप (आत्मिक रूप) किंवा आत्म्याचे ध्येय सेकंदामध्ये आठवेल. त्यांच्या दयेच्या संकल्पाने भिकाऱ्याला सर्व खजिन्यांची झलक दिसून येईल. भटकणाऱ्या आत्म्यांना मुक्ती किंवा जीवनमुक्तीचा किनारा आणि लक्ष्य समोर दिसेल. ते सर्वांचे दुःख-हर्ता, सुख-कर्ता चा पार्ट बजावतील, दुःखी आत्म्यांना सुखी करण्याची युक्ती आणि साधन नेहमी त्यांच्या जवळ जादूच्या किल्ली प्रमाणे असेल.

बोधवाक्य:- सेवाधारी बनून नि:स्वार्थ सेवा करा तर सेवेचा मेवा मिळणारच आहे.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा.

अंतीम समयी प्रकृतीची पाचही तत्वे चांगल्या रीतीने हादरविण्याचा प्रयत्न करतील, परंतु जी विदेही अवस्थेची अभ्यासी आत्मा असेल ती एकदम अशी अचल-अडोल पास विद ऑनर असेल जी सर्व गोष्टी घडून जातील परंतु ती ब्रह्मा बाबांप्रमाणे पास विद ऑनरचा पुरावा देईल, यासाठी वेळ काढून प्रकृतीच्या पाचही तत्त्वांची सेवा करत, शुभ भावनेची सकाश देत रहा.